H&RA WESTERN INDIA

Estd : 1951

# ऑनलाइन हॉटेल बुकिंग फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ

## अधिक सुरक्षित ऑनलाइन नियमावलींसाठी हालचाली सुरू

। मुंबई : ऑनलाइन हॉटेल रूम बुकिंग्ज फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ होत असून आदरातिथ्य ब्रँड्सच्या विरोधात सोशल मीडियावर जाणीवपूर्वक नकारात्मक मोहीम राबवली जात आहे. त्याचबरोबर लोकप्रिय सर्च इंजिन्समध्ये खऱ्या भासतील अशा खोट्या हॉटेल्स संकेतस्थळांची यादी नमूद करणाऱ्या आणि अनभिज्ञ ग्राहकांना गंडवून त्यांना रूम बुकिंग्जसाठी पैसे भरायला लावले जात आहे. सोशल मीडिया प्रभावकांकडून जास्त व्ह्यूज मिळवण्यासाठी आणि फॉलोअर्सना आकर्षित करण्यासाठी खोटे व्हिडीओज तयार करून किंवा खोट्या प्रतिक्रिया नोंदवून ब्रँडची प्रतिष्ठा मलिन केली जात असल्याचे समोर आले आहे. यावर आळा घालण्यासाठी अधिक सुरक्षित ऑनलाइन नियमावलींसाठी हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत.

गेल्या एका वर्षात अशा घटनांची झपाट्याने पुनरावृत्ती झाल्याचे लक्षात घेऊन द हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया (एचआरएडब्ल्यूआय)ने संबंधित सरकारी अधिकारी आणि कायदा अंमलबजावणी एजन्सीसमोर हा मुद्दा मांडण्याची योजना आखली आहे. अनभिज्ञ ग्राहकांना ठकवण्यासाठी आणि ब्रँड्सची प्रतिष्ठा मलिन करण्यासाठी जे ऑनलाइन मंच समाजकंटकांना सहज परवानगी देतात, अशा मंचांनी त्यांच्या मंचावरील मजकुराबाबत कडक नियम करावेत, यासाठी त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचाही हेतू यामागे आहे.

यावाबत एचआरएडब्ल्यूआयचे अध्यक्ष प्रदीप शेट्टी म्हणाले, सायबर-गुन्हेगारांकडून हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सची खोटी बुकिंग संकेतस्थळे तयार केली जाणे, ही उद्योगासाठी अतिशय गंभीर चिंतेची बाब आहे. अशा कृत्यामुळे केवळ ग्राहकांचेच आर्थिक नुकसान होते असे नव्हे, तर आदरातिथ्य आस्थापनांच्या



प्रतिष्ठेचीही यामुळे मोठ्या प्रमाणात हानी होते. ऑनलाइन बुकिंग करताना ग्राहकांनी दक्षता बाळगावी आणि कोणत्याही प्रकारच्या संशयास्पद बाबीची संबंधित अधिकाऱ्याकडे तक्रार करावी, अशी कळकळीची विनंती आम्ही ग्राहकांना करत आहोत. सोशल मीडिया प्रभावक जे त्यांच्या फॉलोअर्सचा गैरवापर करून प्रामाणिक आस्थापनांना ब्लॅकमेल करतात त्यांच्यापासून नागरिकांचे आणि व्यावसायिक संस्थांचे संरक्षण करण्यासाठी कायदे केले जावेत, अशी मागणी करण्यासाठी एचआरएडब्ल्यूआय सरकारशी संपर्क साधणार आहे. हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सच्या संपूर्ण विश्वासार्ह संकेतस्थळांवरून आणि सोशल मीडिया पेजेसवरूनच बुकिंग करण्याचा आणि कोणत्याही संशयास्पद बाबींची तक्रार संबंधित अधिकाऱ्यांकडे करण्याचा सल्ला असोसिएशनने ग्राहकांना दिला आहे.

सायबर गुन्हेगारांची ओळख पटवता यावी आणि त्यांच्यावर कारवाई करता यावी, यासाठी आम्ही काही विशिष्ट घटनांची तक्रार कायदा अंमलबजावणी एजन्सीजकडे करणार आहोत. आम्ही हे प्रकरण अतिशय गंभीरपणे हाताळणार आहोत आणि अशा समाजविघातक घटकांना आपल्या मंचाचा स्वैर गैरवापर करू देणाऱ्या ऑनलाइन मंचांकडे हे प्रकरण घेऊन जाणार आहोत. हॉटेल आणि रेस्टॉरंट उद्योगाच्या हिताला प्रोत्साहन आणि संरक्षण देण्यासाठी एचआरएडब्ल्यूआय वचनबद्ध आहे आणि ग्राहक तसेच अशाप्रकारच्या व्यवसायांसाठी सुरक्षित आणि चिंतामुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी आम्ही काम करत राहणार आहोत, असेही शेट्टी यांनी सांगितले.